Vol 6 Issue 3 April 2016

ISSN No : 2230-7850

International Multidisciplinary Research Journal

# *Indian Streams Research Journal*

Executive Editor
Ashok Yakkaldevi

Editor-in-Chief
H.N.Jagtap

Welcome to ISRJ

RNI MAHMUL/2011/38595 ISSN No.2230-7850

Indian Streams Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

**Regional Editor**

Manichander Thammishetty
Ph.d Research Scholar, Faculty of Education IASE, Osmania University, Hyderabad.

Mr. Dikonda Govardhan Krushanahari
Professor and Researcher ,
Rayat shikshan sanstha's, Rajarshi Chhatrapati Shahu College, Kolhapur.

***International Advisory Board***

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

***Editorial Board***

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.org**

ISSN: 2230-7850 Impact Factor : 4.1625(UIF) Volume - 6 | Issue - 3 | April - 2016

Indian Streams Research Journal

# महाराष्ट्र शासनाच्या कृषी विषयक अंदाजपत्रकीय तरतुदीचा कृषी उत्पादनावरील परिणाम

एस. बी. काळे[1] , ए.एच. देशमुख[2]
अर्थशास्त्र विभाग प्रमुख जिजामाता शास्त्र व कला महाविद्यालय,
ज्ञानेश्वरनगर,भेंडा बु. ता. नेवासा, जि. अहमदनगर .
पीएच.डी. संशोधक विद्यार्थीनी.

**सारांश :-**

भारतीय अर्थव्यवस्था कृषीप्रधान अर्थव्यवस्था आहे. भारताच्या आर्थिक विकासात शेती मोलाची भूमिका बजावित असल्यामुळे शेतीला अर्थव्यवस्थेचा कणा संबोधिले जाते. भारतीय कृषीक्षेत्रावर आज देखील प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरीत्या जवळजवळ 60–62 टक्के लोक अवलंबून आहे. देशातील सर्वच क्षेत्रांचा विकास करायचा असेल तर सर्वात प्रथम कृषीक्षेत्राचा विकास होणे आवश्यक आहे. कृषीक्षेत्रासाठी अंदाजपत्रकीय तरतूद केली जाते. त्याचा कृषी उत्पादनावर काय परिणाम झाला याचे विवेचन सदर संशोधनात केले आहे.1990–91 च्या तुलनेत 2012–13 दरम्यान कृषीक्षेत्रासाठीची अंदाजपत्रकीय तरतूद वाढत आहे. परंतु एकुण तरतुदीच्या तुलनेत ही अंदाजपत्रकीय तरतुदीत घट होताना दिसून येत आहे. कृषी उत्पादनात वाढ होण्यासाठी महाराष्ट्र शासन विविध कृषीविषयक योजना व धोरणे राबवत आहे. त्यामुळे कृषी उत्पादनात देखील वाढ होत आहे. परंतु दर हेक्टरी उत्पादकता कमी झालेली दिसून येते. यासाठी अनेक कारणे जबाबदार आहे. परंतु महाराष्ट्र शासनाने अंदाजपत्रकात कृषीसाठीच्या तरतुदीत आणखी वाढ केली व त्यानुसार योग्य अंमलबजावणी केली तर कृषी उत्पादकता वाढेल. परिणामी इतर क्षेत्रांचाही विकास होवून राष्ट्रीय उत्पन्नात वाढ होईल.

**कळीचे शब्द :–** कृषी उत्पादन, अंदाजपत्रक, तरतुदी

**प्रस्तावना :–**



शेती हे अर्थव्यवस्थेतील मुलभूत क्षेत्र आहे. देशातील वाढत्या लोकसंख्येचा विचार केला तर आजही अनेक राष्ट्रे उपजिविकेसाठी शेतीवरच अवलंबून आहे. भारतात जवळ–जवळ 60–62 टक्के लोक प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरित्या शेती क्षेत्रावरच अवलंबून आहे. इतर देशांशी तुलना करता राष्ट्रीय उत्पन्नातील शेतीक्षेत्राचा वाटा भारतात जास्त दिसून येतो. भारतीय शेती विदेशी व्यापारातही महत्त्वाची भूमीका बजावत आहे. अर्थव्यवस्थेत अनेक क्षेत्र परस्परपूरक असल्याने कोणत्याही क्षेत्राचा विकास करावयाचा असल्यास प्रथम कृषीक्षेत्राचा विकास करणे आवश्यक आहे. भारतीय अर्थव्यवस्थेचा मुलभूत पाया कृषीक्षेत्र आहे. कृषीच्या या महत्त्वपूर्ण भूमीकेमुळे शेतीला अग्रगण्य स्थान प्राप्त झाले आहे. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर भारताच्या सर्वांगिण विकासासाठी 1950–51 पासून आर्थिक नियोजनाचा स्विकार केला. कृषी हा राज्य सरकारच्या अखत्यारितील विषय आहे. लोककल्याणकारी राज्याच्या दृष्टीकोनातून अलीकडील काळात शासनाच्या अंदाजपत्रकास महत्त्व प्राप्त झाले आहे. कारण अंदाजपत्रकातील आय आणि व्ययाच्या तरतूदीमुळे संबंध अर्थव्यवस्थेवर परिणाम होत असतात. किंमत पातळी, उत्पादन, रोजगार यावर अंदाजपत्रकातील तरतूदीमुळे परिणाम होत असतो. राज्य सरकारच्या अंदाजपत्रकामध्ये वेगवेगळया क्षेत्रासाठी तरतूद केलेली असते. त्यामुळे कृषीक्षेत्राच्या सर्वांगिण विकासासाठी राज्य सरकारने भरीव तरतूद करून त्याची योग्य अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. तरच कृषीक्षेत्राच्या विकासाला चालना मिळेल कारण अंदाजपत्रक हे राज्याच्या विकासाचा दिशा दर्शक असतो. या अंदाजपत्रकावर कृषी विकास अवलंबून असतो. राज्याच्या अंदाजपत्रकात कृषीक्षेत्रासाठी किती तरतूद केलेली आहे. आणि त्याचा कृषी उत्पादनावर काय परिणाम झाला याचे विवेचन या लेखात केले आहे.

### 1.अभ्यासाची उद्दिष्टये :–

महाराष्ट्र शासनाच्या कृषीविषयक अंदाजपत्रकीय तरतूदीचा कृषी उत्पादनावरील परिणामः– एक अभ्यास या शोध निबंधाची प्रमुख उद्दिष्टये पुढीलप्रमाणे आहेत.

1.महाराष्ट्र शासनाच्या कृषीविषयक योजनांचा आढावा घेणे.
2.महाराष्ट्र शासनाची कृषीविषयक अंदाजपत्रकीय तरतूदींची प्रवृत्ती स्पष्ट करणे.
3.कृषीविषयक अंदाजपत्रकीय तरतूदीचा कृषी उत्पादनावरील परिणाम अभ्यासणे.

### 2.संशोधन पध्दती:–

महाराष्ट्र शासनाच्या कृषीविषयक अंदाजपत्रकीय तरतूदीचा कृषी उत्पादनावर होणारा परिणाम या शोध निबंधासाठी प्रामुख्याने द्वितीय आधार सामग्रीचा वापर करण्यात आला आहे. हि द्वितीय माहिती व आकडेवारी प्रामुख्याने महाराष्ट्र शासनाचे अंदाजपत्रक, महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी प्रकाशित केलेले अहवाल, अहमदनगर जिल्हा परिषद अहवाल, विविध संदर्भ ग्रंथ, नियतकालिके, कृषीविषयक सांख्यिकी अहवाल आणि विविध संकेतस्थळे इ. स्त्रोतापासून संकलित केली आहे. या द्वितीय माहिती व आकडेवारीवर आधारीत प्राप्त निष्कर्षाच्या आधारे शोध निबंधाचे विवेचन केले आहे.

### 3.महाराष्ट्र शासनाच्या कृषीविषयक योजना :–

देशाच्या आर्थिक विकास होण्यासाठी आर्थिक नियोजनाचा स्विकार केला. तेव्हाच कल्याणकारी राज्याची संकल्पना जगभर मान्यता पावली. समाजाचे आर्थिक व सामाजिक कार्य राजसत्तेने हाती घेऊन समाज परिवर्तनाबरोबर आर्थिक विकास घडवून आणणे याची जाणीव सरकारला झाली. लोकांच्या किमान आवश्यक गरजांची पूर्तता करणे, राष्ट्रीय उत्पन्न व संपत्तीचे समान वाटप करणे ही कर्तव्ये पार पाडण्यासाठी सरकार अंदाजपत्रकाच्या माध्यमातून विविध बाबींवर खर्च करते.राज्य सरकारने शेती विकासासाठी शेती कर्ज पुरवठा, शेती संशोधन, शेती, उदयोग आणि शेतमाल विक्री व्यवस्था इ. अनुषंगाने विविध धोरणे जाहिर केलेली आहे. पहिल्या पंचवार्षिक योजनेमध्ये कृषीक्षेत्रावर भर देण्यात आला. शेती उत्पादनात वाढ करण्यासाठी आणि शेतीक्षेत्राची लाभ प्रदना वाढावी म्हणून नोव्हेंबर 1996 मध्ये कृषीधोरण जाहिर केले. 1कोटी हेक्टर पडिक जमीन लागवडी खाली आणावी म्हणून 'राष्ट्रीय पडीत जमीन विकास महामंडळाची' स्थापना केली. दुष्काळ निवारण्यासाठी 'पाणलोट क्षेत्र विकास योजना' सुरू करण्यात आली. पिकांचा कम बदलून शेतमालावर प्रक्रिया आणि विपणन यादवारे स्वयंरोजगार निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे. 1992–93 मध्ये निळे–हिरवे शेवाळ उत्पादन केंद्राची स्थापना आणि जैविक नियंत्रण प्रयोग शाळेची स्थापना करण्यात आली आहे. पिक संरक्षणासाठी पिक विमा योजनाही सुरू केलेली आहे.

इस्त्राइलने वापरलेले तंत्रज्ञान महाराष्ट्रात वापरण्यासंदर्भात अभ्यास चालू आहे. शेतीतील महिलांचा सहभाग वाढावा म्हणून अनेक योजना शासनाने पुरस्कृत केल्या आहे. शेतीला कर्ज पुरवठा करण्यासाठी आणि ग्रामीण भागाचा विकास करण्यासाठी शेती पतपुरवठा, बहुउद्देशीय पतपुरवठा, पणन प्रक्रिया, सरकी, कापसाच्या गाठ, तळे गाळणे,साखर व गुळ उत्पादन दुग्ध व्यवसाय, कुक्कुटपालन, वराह पालन इ. क्षेत्रासाठी सहकारी संस्था स्थापन करण्यावर शासनाने भर दिला आहे. या व अशा अनेक योजना सरकारने शेती विकासासाठी सुरू केलेल्या आहेत. देशातील अनेक महत्त्वाच्या समस्या शेतीक्षेत्राच्या विकासातून सोडविल्या जावू शकतात. देशाच्या सर्वांगिण विकासासाठी कृषी क्षेत्र महत्त्वपूर्ण आहे. अशा प्रकारे कृषीचे महत्त्व ओळखून सरकारने त्यादृष्टीने आपली पाऊली उचलली आहे. सरकार शेतक–यांना वेळोवेळी विविध योजनांवर अनुदान देखील देत आहे. या सर्व योजनांच्या विकासासाठी, भांडवल पुरवठयासाठी सरकार याची तरतूद अंदाजपत्रकात करते.

### 4.महाराष्ट्र शासनाची कृषीविषयक अंदाजपत्रकीय तरतूदः–

अंदाजपत्रकाच्या आधारे आगामी वर्षातील अपेक्षित उत्पन्न आणि अपेक्षित खर्च यांचा मेळ घातला जातो. महाराष्ट्र शासनाने शेती क्षेत्रासाठी केलेली योजना खर्च व बिगर योजना खर्च या सदराखाली खर्च करून शेतीच्या विकासाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण पावले उचलली दिसतात. या खर्चासाठी सरकार लोकांकडून कराची आकारणी करून उत्पन्न जमा करते आणि ते लोकांच्या कल्याणासाठीच खर्च केले जाते. या उत्पन्न व खर्चाची तरतूद अंदाजपत्रकात केली जाते. या उत्पन्न व खर्चाच्या माध्यमातून सरकारवर अनुकुल परिणाम घडवून आणून अर्थव्यवस्था विकासाकडे वेगाने जाण्याचे भविष्यकालीन धोरण सरकार पूर्वीही करत होते. आणि आज तर त्यामध्ये मोठया प्रमाणात बदल झाले आहे. सरकारचा एकुण अंदाजपत्रकीय खर्च हा सर्वसाधारणपणे सेवांवरील खर्च, सामाजिक सेवांवरील खर्च व आर्थिक सेवांवरील खर्च असा विभागलेला आहे. आर्थिक सेवांवरील खर्चामध्ये शेती व शेती संलग्न क्षेत्र, ग्रामीण विकास, जलसिंचन व पूर नियंत्रण, उर्जा व उदयोग, खनिजे, वाहतूक–दळणवळण, विज्ञान, तंत्रज्ञान आणि पर्यावरण, इतर आर्थिक सेवांवरील खर्च इत्यादीवरील खर्चाचा समावेश होतो. यामध्ये महाराष्ट्र शासनाने अंदाजपत्रकात कृषीसाठी किती तरतूद केलेली आहे. याचे विवेचन तक्ता क.1 मध्ये दिलेले आहे.

**तक्ता क्र.1**
**महाराष्ट्र शासनाची कृषीविषयक अंदाजपत्रकीय तरतूद (कोटीत)**

| अ.क्र | वर्ष | एकुण तरतूद | कृषी क्षेत्रासाठी केलेली तरतूद | एकुण तरतूदीशी कृषीक्षेत्राचे परिणाम |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १. | १९९०-९१ | १३,०४३.१५ | ९४४.०८ | ७.२४ |
| २. | २००४-०५ | ७८,४४८.१५ | २,०४६.१६ | २.६१ |
| ३. | २००७-०८ | ८७,२१४.४७ | २,७२७.७२ | ३.१३ |
| ४. | २००८-०९ | ९९,९७२ | ६,४०३ | ६.४० |
| ५. | २०१०-११ | १३,१,००५ | ५,६३६ | ४.३० |
| ६. | २०११-१२ | १४,९,२२८ | ६,१४५ | ४.११ |
| ७. | २०१२-१३ | १६,५,४६९ | ७,२१८ | ४.३६ |

स्त्रोत :– महाराष्ट्राची अर्थसंकल्पीय अंदाजपत्रके –1990–91 ते 2012–13

वरील तक्त्यावरून असे दिसून येते की, महाराष्ट्र शासनाने 1990–91 मध्ये एकुण 13,043.15 कोटी तरतूदीपैकी कृषीक्षेत्रासाठी 944.08 कोटी रूपये इतकी तरतूद केलेली होती. म्हणजेच एकुण तरतूदीशी कृषीक्षेत्राचे प्रमाण 7.24 टक्के इतके होते. 2004–05मध्ये 78,448.15 कोटीपैकी कृषीसाठी 2,046.16 कोटी रूपये इतकी कृषीसाठी अंदाजपत्रकीय तरतूद केलेली होती. म्हणजेच एकुण तरतूदीपैकी कृषी तरतूदीचे प्रमाण 2.61 टक्के इतके होते. म्हणजेच 1991 नंतर 2004–05 पर्यंत कृषी क्षेत्रासाठीच्या तरतूदीच्या प्रमाणात मोठया प्रमाणावर घट झालेली दिसून येते.

2008–09 मध्ये 99,972 कोटीपैकी कृषीसाठी 6,403 कोटी रूपयाची तरतूद केली होती. या वर्षी मात्र कृषीसाठी तरतूदीचे प्रमाण वाढलेले दिसून येते. 2011–12 मध्ये एकुण अंदाजपत्रकीय तरतूदीपैकी कृषी क्षेत्रासाठी 4.11 टक्के तरतूद केलेली आहे. 2012–13 मध्ये 1,65,469 कोटी रूपयांपैकी कृषी क्षेत्रासाठी 7,218 कोटी रूपये इतकी तरतूद केलेली आहे. म्हणजेच एकुण अर्थसंकल्पीय तरतूदीपैकी कृषीक्षेत्रासाठी 4.36 टक्के इतकी तरतूद केलेली दिसून येते.

एकंदरीत तक्त्यावरून असे दिसून येते की, नविन आर्थिक धोरण स्विकारल्यापासून कृषीसाठी केलेली अंदाजपत्रकीय तरतूद ही प्रत्येक वर्षी वाढतच आहे. परंतु अंदाजपत्रकातील एकुण तरतूदींचा विचार केल्यास एकुण तरतूदीत कृषी क्षेत्रासाठीची तरतूद यांचे प्रमाण मात्र घटत असल्याचे दिसून येते. त्यामुळे याचा परिणाम कृषीउत्पादनावर होत आहे.

5. महाराष्ट्रातील कृषी उत्पादकता :–

उत्पादन प्रक्रियेतील विविध घटकांमध्ये भूमी हा घटक महत्त्वपूर्ण आहे. भूमीचा वापर वेगवेगळया बाबींकरीता होत असला तरी जमीनीचा पूरवठा अलवचिक असल्यामुळे भूमीचे दिवसेंदिवस महत्त्व वाढत आहे. महाराष्ट्रात उपलब्ध एकुण भौगोलिक क्षेत्रफळापैकी (3,07,690 चौ. किमी.) 2010–11 मध्ये निव्वळ पेरणी क्षेत्र 17,406 हजार हेक्टर इतके होते. एकुण पिकाखालील स्थूल क्षेत्र 22,175 हजार हेक्टर इतके होते. महाराष्ट्र राज्यात 1960–70 या दशकात उत्पन्न वाढीचा वेग 2.5 टक्के होता. तो वाढत जाऊन 1990–2000 या दशकात तो 6.2 टक्के इतका वाढला या कृषी उत्पादनात वाढ होण्यासाठी राज्य सरकारने विविध धोरणे व योजना आखल्या.त्याच्या योग्य अंमलबजावणीसाठी अंदाजपत्रकीय तरतूद देखील केली जाते. महाराष्ट्रातील कृषी उत्पादनाविषयी आकडेवारी तक्ता क्र.2 मध्ये दिलेली आहे.

**तक्ता क्र. 2**
**महाराष्ट्र राज्यातील मुख्य पिकांचे उत्पादन (हजार टनमध्ये)**

| अ.क्र | पीक | १९९०-९१ | २०००-०१ | २००५-०६ | २००६-०७ | २०१०-११ | २०१३-१४ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | तांदूळ | २,३४४ | १,९३० | २,६९५ | २,५६९ | २,६९१ | ३,१२० |
| २. | गहू | ९०९ | ९४८ | १,३०० | १,८६९ | २,३०१ | १,६०२ |
| ३. | ज्वारी | ५,९२९ | ३,९८८ | ३,७११ | ३,७७२ | ३,४५२ | २,४८२ |
| ४. | बाजरी | १,११५ | १,०८७ | ९३२ | १,०५९ | १,१२३ | ७८८ |
| ५. | सर्व तृणधान्ये | १०,७४० | ८,४९७ | ९,१३८ | ९,३०८ | १२,३१७ | ११,४०४ |
| ६. | सर्व कडधान्ये | १,४४१ | १,६३७ | १,९९२ | २,३०४ | ३,०९६ | ३,१७० |
| ७. | सर्व अन्नधान्ये | १२,१८१ | १०,१३३ | ११,७६८ | १२,८८२ | १५,४१३ | १४,५७४ |
| ८. | कापुस | १,८७५ | १,८०३ | ३,१६० | ४,६१८ | ७,४७३ | ८,८३४ |

स्त्रोत :– महाराष्ट्राची आर्थिक पाहणी –2014–15

वरील तक्त्यावरून असे दिसून येते की, 1990–91 मध्ये तांदूळ व गव्हाचे उत्पादन अनुक्रमे 2,344 हजार टन व 909 हजार टन इतके होते. ते वाढत जावून 2013–14 मध्ये 3,120 व 1,602 हजार टन इतके झाले. 1990–91 च्या तुलनेत 2013–14 मध्ये ज्वारी आणि बाजरीच्या उत्पादनात घट झालेली दिसून येते. सर्व तृणधान्याचे उत्पादन 1990–91 ला 10,740 हजार टन होते ते वाढत जावून 2010–11 मध्ये 12,317 हजार टन 404आणि 2013–14 मध्ये 11,404 हजार टन इतके झाले. तृणधान्याबरोबर सर्व कडधान्यामध्येही वाढझालेली दिसून येते. तसेच अन्नधान्याचे उत्पादनात देखील वाढझालेली आहे. 1990–91 मध्ये अन्नधान्याचे उत्पादन 12,181 हजार टन इतके होते.

2010–11 मध्ये 15,413 हजार टन तर 2013–14 मध्ये ते 14,574 हजार टन इतके वाढले.

एकंदरीतच तक्त्यावरून असे लक्षात येते की, महाराष्ट्रातील प्रमुख पिकांच्या उत्पादनात वाढझालेली आहे. असे असले तरीही लोकसंख्येचा विचार करता हे उत्पादन कमीच आहे. कारण महाराष्ट्र हे भारतात तिस–या क्रमांकाचे मोठे राज्य आहे. आणि एकुण लोकसंख्येपैकी 56.6 टक्के लोकसंख्या अजूनही शेती क्षेत्रावर अवलंबून आहे. तसेच महाराष्ट्रात एकुण राज्यांतर्गत उत्पादनात प्राथमिक क्षेत्राचा वाटा 1,484 टक्क्यापर्यंत कमी झालेला आहे. आणि द्वितीय व तृतीय क्षेत्राचा वाटा वाढलेला आहे. म्हणजेच महाराष्ट्रात मुख्य व्यवसाय शेती हा आहे. कृषीवर अवलंबून असणा–या लोकांचे प्रमाणही मोठया प्रमाणात आहे. महाराष्ट्र सरकार कृषीसाठी अंदाजपत्रकीय तरतूद व वेगवेगळी धोरणे, योजना देखील राबवत आहे. परंतु कृषी उत्पादनात मात्र पाहिजे तेवढी वाढ होत नाही. यासाठी अनेक कारणे जबाबदार आहे. सतत पडणारा दुष्काळ, मालाला हमी भाव, उत्पादन खर्च, परंपरागत पध्द्तीने शेती करणे, रासायनिक खते आणि सरकारची कृषीसाठीची गुंतवणूक अशा अनेक कारणांमुळे कृषी उत्पादनात समाधानकारक प्रगती झालेली दिसून येत नाही.

एकीकडे उदयोग व सेवा क्षेत्रातील गुंतवणूकीचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे तर दुसरीकडे कृषीक्षेत्रातील गुंतवणूक व पायाभूत सुविधांकडे दुर्लक्ष होत आहे. याचा परिणाम राष्ट्रीय उत्पन्नातील कृषीक्षेत्राचे उत्पन्न घटण्यावर झाला आहे. विकसित देश राष्ट्रीय उत्पन्नाच्या तिन ते चार टक्के रक्कम कृषी संशोधनावर खर्च करतात. परंतु भारतात हे प्रमाण 0.5 टक्के एवढेच आहे. वाढती लोकसंख्या आणि जागतिक स्पर्धा यांचा विचार केल्यास कृषी उत्पादकता वाढणे गरजेचे आहे. यासाठी शासकीय गुंतवणूकीत वाढ करणे गरजेचे आहे. कृषी संशोधन मालाला योग्य किंमत देणे आवश्यक आहे.

### *समारोप :–*

भारत देशाच्या सर्वांगिण विकासासाठी कृषीक्षेत्र अतिशय महत्त्वपूर्ण आहे. आणि कृषी हा राज्य सरकारच्या अखत्यारीतील विषय आहे. लोककल्याणकारी राज्याच्या दृष्टीकोनातून शासनाचे अंदाजपत्रक अतिशय महत्त्वपूर्ण आहे. राज्य पातळीवर कृषीसाठी सरकार आर्थिक तरतूद आणि वेगवेगळया योजना व धोरणेही राबवत आहे. परंतू लोकसंख्येचा विचार करता कृषी उत्पादकता आणखी वाढविणे गरजेचे होते. जर अंदाजपत्रकीय तरतूदीत कृषीसाठी आणखी वाढ केली व त्यानुसार योग्य अंमलबजावणी केली तर कृषी उत्पादकता तर वाढेलच त्याचबरोबर इतर क्षेत्रांचाही विकास होईल.

### *संदर्भसूची*

1.प्रा. डॉ. रसाळ रा.अ.(2012)ः भारतीय अर्थव्यवस्था, सक्सेस पब्लीकेशन, पुणे, पृष्ठ क्र.377–379

2.डॉ. कुरूलकर र.पु.(2010)ः महाराष्ट्राची अर्थव्यवस्था, विदया प्रकाशन नागपूर, पृष्ठ क्र.134

3.महाराष्ट्राची अर्थसंकल्पीय अंदाजपत्रके 1990–91 ते 2012–13

4.महाराष्ट्राची आर्थिक पाहणी –214–15

5.www.agri.mah.nic.in

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- Google Scholar
- EBSCO
- DOAJ
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing



Indian Streams Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.isrj.org